# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३

## (सकाळी १०-३० ते ११-४५ वाजेपर्यंत)

**लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१) ते (७)] —**

(१) **डॉ.मनिषा कायंदे,** सर्वश्री सचिन अहिर, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले पंढरपूर येथे चालू आर्थिक वर्षात कॉरिडॉर तयार करण्याचे प्रस्तावित असणे, पंढरपूर देवस्थान परिसरातील या कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यासाठी ३०० कोटींचा निधी खर्च करण्याचे नियोजित असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ कॉरिडॉर, तसेच मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर प्रकल्पाच्या धरतीवर विकास करण्याचे नियोजन असणे, केंद्र आणि राज्य सरकार संयुक्तपणे खर्चाचा हिस्सा उचलून पंढरपूर शहरातील गल्ल्या, रस्ते, घाट, मठ, लहान-मोठी मंदिरे, चंद्रभागा तीराचा विकास, विठ्ठल मंदिर ते पालखी मार्ग, यावरील विकासाकडे कॉरिडॉर निर्माण करताना खास लक्ष देण्यात येणार असल्याचे पर्यटन मंत्र्यांनी जाहीर करणे, आषाढी एकादशी सह इतर सणांच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वारकरी पंढरपूरात येत असून त्यांना विविध सोयी-सुविधांची कमतरता भासत असल्याने कॉरिडॉर विकासानंतर पंढरपूरचा चेहरा मोहरा बदलण्याचे भाकीत करणे, याबाबत ऑक्टोबर महिन्यामध्ये पर्यटन मंत्री यांच्याकडून घोषणा झाल्यानंतर पंढरपूरसह राज्यभरातील वारकऱ्यांचा या विकासाकरिता विरोध असणे, सदर कॉरिडॉर विकासामुळे शहरातील नागरिकांसह मोठ्या प्रमाणावर जुनी मंदिरे व मठांचे पुनर्वसन करावे लागत असल्यामुळे स्थानिकांचा कॉरिडॉर करिता प्रचंड विरोध असणे, याबाबत काही लोकप्रतिनिधींनी हायकोर्टात याचिका दाखल करून कॉरिडॉर करिता विरोध दर्शविणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(२) **श्री.अनिकेत तटकरे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"रायगड जिल्हयातील मौजे चोची व मौजे कोंढाणे ता.कर्जत येथे शासनामार्फत धरण बांधण्याचे काम प्रस्तावित असणे, या ठिकाणच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असणे, मौजे चोची

अप्रकाशित

व कोंढाणे येथील मिळकती अस्तित्वात असल्यापासून आदिवासी शेतकरी सदर मिळकतीचे कुळ म्हणून कायम असणे, या जमिनीवर सर्व आदिवासी शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असणे, सर्व आदिवासी शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्याचे कळविण्यात आलेले असणे, या संदर्भात सर्व आदिवासी शेतकऱ्यांनी लेखी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी खुलासा कळविलेला असणे, या मिळकती भूसंपादित होणार असल्याची माहिती मिळाल्यावर महसूल विभागाचे अधिकारी याचेकडून कुळाचे खाजगी सावकारांशी संधान साधणे, शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटीसा आल्यावर कुळ बदलण्याचा प्रयत्न करणे, सावकारांना कायदा कुळाच्या जमिनीवर हक्क सांगण्यासाठी प्रवृत्त करणे, या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक यांच्या नावावर करण्याचा प्रयत्न करणे, शासकीय नियमाची पायमल्ली व आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन आदिवासी शेतकऱ्यांवरच दबाव टाकणे, त्यांची फसवणूक करणे, एकूणच या जमिन भूसंपादनामध्ये आदिवासी बांधवांची फसवणूक करुन शासकीय अधिकारी जमिनीचा गैरव्यवहार करीत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी व याबाबत शासनाची भूमिका."

**(३)** **श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या (महानंद) या शासकीय संस्थेत झालेल्या आर्थिक गैरप्रकाराबाबत पावसाळी अधिवेशन २०२२ दरम्यान लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येणे, सदर लक्षवेधी सूचनेवर विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये मंत्री महोदयांनी सदर झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, यानुसार दिनांक २२ ऑगस्ट २०२२ च्या शासन निर्णयानुसार आयुक्त दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून अद्यापपर्यंत तो प्रसिद्द करण्यात न आल्याचे समोर येणे, महासंघाने संचालक मंडळाच्या मान्यतेने पिशवीबंद दुधाला रु. २८ कोटी अनुदान वाटप केल्याने महासंघाच्या अर्थव्यवस्थेवर अनावश्यक भार पडून महासंघाची आर्थिक स्थिती ढासळली असल्याची बाब उघडकीस होणे, याबाबत संचालक मंडळाने चुकीचा ठराव मंजूर केल्याने सदर स्थिती उद्‌भवली असून रु.२८ कोटी रकमेची वसुली संबंधित संचालकांकडून करण्याची कार्यवाही करावी असे आदेश शासनाने दिले असल्याची बाब समोर येणे, महासंघाच्या गलथान कारभारामुळे येथील कामगार व कर्मचारी यांना अनेक समस्या भेडसावत असणे, कामगारांच्या प्रश्नांबाबत दिनांक २२.११.२०२२ रोजी मुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्री यांच्या समवेत कामगारांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये

अप्रकाशित प्रत

मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासन व दुध महासंघाच्या व्यवस्थापनाकडून योग्य रीतीने झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी कामगारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, कामगारांचे होत असलेले हाल लक्षात घेता सदर आदेशाची अंमलबजावणी तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

(४) **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"पुणे शहराला स्मार्ट सिटीचा दर्जा असून याच स्मार्ट पुण्यातील ससून रुग्णालयासारख्या नामांकित रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सुविधांची वानवा असणे, तसेच राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रूग्णालयांना सुविधा उपलब्ध होत नसणे तसेच अनेक पदे रिक्त असल्याची बाब समोर येणे, ससून रुग्णालयात मेडिकल विभागाच्या कार्डिओलॉजी, जठरांत्रमार्ग रोग विभाग (गॅस्ट्रॉइंटेरॉलॉजी), मेंदूविकार (न्यूरोलॉजी) व नेफ्रॉलॉजी विभाग तर शल्यचिकित्सामध्ये असलेल्या हृदयशल्यचिकित्सा विभाग (सीव्हीटीएस), प्लास्टीक सर्जरी, मेंदुशल्यचिकित्सा (न्युरोसर्जरी), मूत्रविकार (युरोलॉजी) व बालशल्यचिकित्सा (पेडियाट्रिक सर्जरी) या विभागात स्पेशालिस्ट, सुपरस्पेशालिस्ट मनुष्यबळाची पदेच मंजूर नसल्याने शल्यसुविधा पुरविण्यास अत्यंत अडचणी येणे, या विभागाचे श्रेणीवर्धन किंवा विस्तार अनेक वर्षांपासून रखडले असून हे विभाग पूर्ण ताकतीने सुरू होण्यासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक अशी पदे भरणे आवश्यक असताना याकडे रुग्णालय प्रशासनाचे व शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या विभागांत गोरगरीब रुग्णांना तसेच उच्च स्वरूपाच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना यापासून वंचित राहवे लागत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन ससून रुग्णालय, तसेच अशीच परिस्थिती असलेल्या राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रुग्णालयातील रिक्त असलेली अनेक पदे त्वरीत भरण्याची व या रूग्णालयात सुपर स्पेशालिटी साठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(५) **श्री.महादेव जानकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा कक्ष मुंबई येथे कार्यरत अधिक्षक अभियंता यांनी बांधकामाच्या निविदामध्ये ठराविक कंत्राटदाराला निविदा बहाल करुन सदर कामे वेळेत पार न पाडणे व राज्याचा

अग्रिम प्रत

बांधकामाचा खर्च कमी होणे, यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले असणे, तसेच उपरोक्त अधिकारी यांनी फिल्ड हॉस्पिटलची निविदा अटी व शर्ती पूर्ण न करता ठराविक कंत्राटदाराला दिल्यामुळे तीन महिन्याची मुदत असतानाही वर्षभर काम पूर्ण न होणे व निकृष्ट दर्जाचे काम होणे, MCH WING ची निविदा प्रकिया उशिरा करणे ठराविक कंत्राटदाराला काम देण्याकरता अटी व शर्ती बदलणे, निविदा प्रकिया पूर्ण होऊनही वर्क ऑर्डर न देणे यामध्ये मोठे प्रमाणात निविदाधारकाकडून टक्केवारी घेणे, एकंदरीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत पायाभूत सुविधा कक्षामार्फत होत असलेल्या कामांमध्ये तांत्रिक मान्यतेसाठी टक्केवारी घेणे, ठराविक निविदाधारकाला निविदा देणे त्यामध्ये आर्थिक फायदा झाल्याशिवाय पुढची कारवाई न करणे हे करतांना उपसंचालक स्तरावरील कार्यकारी अभियंता यांना हाताशी धरुन निविदा प्रकिया पूर्णपणे मॅनेज करुन ठराविक ठेकेदाराला देणे, सदर निविदा प्रकियेमध्ये फक्त कंत्राटी अधिकारी असल्यामुळे मोठया प्रमाणात अनियमितता असणे, त्यामुळे एक वर्षाचे काम  चार-पाच वर्ष होत आले तरी पूर्ण न होणे असे असून निविदाधारकावर जिल्हा स्तरावरुन ब्लॅकलिस्टिंग कारवाई प्रस्तावित केली तरी आर्थिक फायदयापोटी त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे खर्च न होणे, केंद्र शासनाने याबाबत नाराजी व्यक्त केली असणे, राज्याचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे जनसामान्यांमध्ये आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडाला असल्याचे आढळून येत असणे, तसेच वरील प्रकरणी चौकशी केली नसल्याने व या भ्रष्टाचार करणाऱ्या अधिक्षक अभियंता यांच्यावर कोणतेही कारवाई किंवा चौकशी न केल्यामुळे जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

(६) **श्री.नरेंद्र दराडे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था इगतपुरी/निकाह (जि.नाशिक) यांनी त्यांच्या कार्यकाळात घाटनदेवी औद्योगिक सहकारी वसाहत मर्या, इगतपुरी या संस्थेचे बेकायदेशीररित्या घाटनदेवी गृहनिर्माण सहकारी संस्थेत रूपांतर करणे, मंजूर सहकार संस्थेच्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी देतांना वैधानिक कार्यकक्षा ओलांडून संस्थेच्या कार्यक्षेत्रात बदल करणे, उक्त सहाय्यक निबंधक इगतपूरी येथे कार्यरत असतांना मुख्यालयी वास्तव्यास न रहाणे, तसेच ते नियमितपणे कार्यालयात उपस्थित न राहणे, मासिक दैनंदिनी सादर न करणे त्याच प्रमाणे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कायदा कलम ८८ चौकशी न करणे, कामकाज विहीत मुदतीत पूर्ण न करणे, या सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित असणे, त्यांनी शासकिय कामकाजात हलगर्जीपणा करुन, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम

(एक) (तीन) चा भंग केल्याप्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी सविस्तर प्रस्ताव दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे, त्यानंतर दिनांक ३१/१०/२०२२ रोजी विद्यमान सहायक तसेच दिनांक २८/१२/२०२२ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, निफाड यांनी उक्त गैरव्यवहार प्रकरणीचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सादर करणे, तथापी अद्याप याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, उक्त तत्कालीन सहाय्यक निबंधक हे सध्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे येथे कार्यरत असून त्यांच्या कामकाजाबाबत धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळेच्या अध्यक्षांनी दिनांक २२/०९/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दाखल करणे, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने चौकशी करुन कामकाजात हलगर्जीपणा व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

(७) **सर्वश्री किरण सरनाईक, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यामध्ये विमुक्त जाती, भटक्या जमाती, उच्च माध्यमिक आश्रम शाळा, ज्युनिअर कॉलेज १४७ असणे, त्यामध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू असणे, परंतु उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा वेतन बँड लागू असणे, शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विभाग यामध्ये कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना हा लाभ मिळत असणे, परंतु बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या जवळपास आश्रमशाळेतील ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ मिळत नसणे, हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण विभागाचा भाग असणे, त्यांनाही निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणीचा लाभ सातवा वेतन आयोगानुसार देण्याची मागणी सातत्याने या शिक्षकांकडून करण्यात येत असणे, त्यांना हा लाभ मिळत नसल्याने या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या आश्रमशाळेतील जवळपास ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ मिळण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(क) तारांकित प्रश्न.**

**(ख) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे —**

**मुख्यमंत्री** : "महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीतील पंधरावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).**

**(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) — [अनुक्रमांक (१) ते (३)] —**

(१) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

अकोला जिल्ह्यातील पातुर तालुक्यातील अंबाशी येथे राहणाऱ्या टायपिंग इन्स्टीट्युटच्या विद्यार्थ्यावर झालेल्या हल्ल्याबाबत.

(२) **सर्वश्री विक्रम काळे,** शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, **वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

पारगांव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटूंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून आल्याबाबत.

(३) **श्री,जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) निवेदन करतील :-**

खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या मुळ रक्कमेवर ३००

अमुद्रित प्रत

कोटी रुपयांच्या व्याजाची रक्कम शासनाला द्यावी लागत असल्याबाबत.

**(शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन) — [अनुक्रमांक (४)] —**

(४) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १४ वर वैद्यकीय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

मुंबई, भिवंडी, ठाणे शहर परिसरात बोगस डॉक्टरांचे दवाखाने आणि खाजगी पॅथॅलॉजिक लॅब (प्रयोगशाळा) मोठ्या प्रमाणात सुरु असल्याबाबत.

(५) **श्री.जयंत पाटील, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ११ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

राजुरा व कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी व इतर शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या भूसंपादनावेळी शासन व अंबुजा सिमेंट कंपनी यांच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन होत नसल्याबाबत.

(६) **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, **वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर उप मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी मठातील ५२ गाईंचा संशयास्पदरित्या मृत्यू झाल्याबाबत.

(७) **श्री.सत्यजित तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १५ वर आदिवासी विकास मंत्री निवेदन करतील :-**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील मुख्याध्यापिकेने विद्यार्थिनींशी अयोग्य वर्तन केल्याबाबत.

(८) **सर्वश्री किरण सरनाईक,** राजेश राठोड, सत्यजित तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, **वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

सन २०२२-२३ ची संच मान्यता स्टुडंट पोर्टलमध्ये अपलोड केलेले आधारकार्ड गृहीत धरुन करण्यात यावी व इनव्हॅलीड दाखवत असलेल्या आधारकार्ड संदर्भात निर्णय घेण्याबाबत.

अग्रिम प्रत

(९) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १२ वर शालेय शिक्षण मंत्री निवेदन करतील :-**

गोरेगांव (मुंबई) येथील एम.ए.इंग्लिश स्कुल या शाळेच्या व्यवस्थापनाने पालक व विद्यार्थ्यांच्या केलेल्या फसवणूकीबाबत.

**चार : लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —**

**(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ व बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (१)] —**

(१) **श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरु झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरु असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्रीमती उमा खापरे,** श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक

अग्रिम प्रत

कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ व बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (३) व (४) ] —**

**(३)** **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वरळी, मुंबई येथील गांधीनगर परिसरात निर्माणाधीन असलेल्या इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट पडल्याने रस्त्याने जाणाऱ्या दोघा पादचाऱ्यांचा नाहक मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी घडली असणे, या दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्ती एका एक्स्पोर्ट कंपनीत कामाला असणे, वरळीच्या गांधीनगर परिसरात 'फोर सीझन' हॉटेलच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असणे, या निर्माणाधीन इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट खाली कोसळलेली असणे, या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोनही पादचाऱ्यांना तब्बल अर्धा तास रस्त्यावर उपचाराविना पडून राहावे लागणे, 'गोल्डन अवर' मध्ये त्यांना वैद्यकीय मदत सहाय्यता देण्यात संबंधित विकासकाच्या व्यवस्थापनाने अक्षम्य हलगर्जीपणा केलेला असणे, अखेर त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असणे, या दुर्घटनेत काही वाहनांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठी वीट पडल्याने विकासकाकडून करण्यात आलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, तसेच निर्माणाधीन इमारतीतील अनेक अनियमिततेकडे शासकीय यंत्रणेने हेतुपुरस्सर केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू दुर्घटनेत विकासक आणि त्याच्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना नाहक प्राण गमवावे लागले असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, भविष्यात संबधित विकासकाच्या बेपर्वा वर्तणूकीमुळे अशाच प्रकारची दुर्घटना घडून अन्य नागरिकांना देखील जीव गमवावा लागण्याची असलेली दाट शक्यता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि संबधित विकासकाच्या

अप्रकाशित प्रत

अनधिकृत कृत्यास शासनाकडून देण्यात येत असलेले अभय, परिणामी, सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री शशिकांत शिंदे,** विक्रम काळे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यातील मौजे तडवळे स. वाघोली येथील गट क्र. ६४/१ या ठिकाणी अवैध पध्दतीने स्टोन क्रशर सुरु असून मंडळाची संमती न घेता हे स्टोन क्रशर चालविले जात असणे, हे क्रशर चालू करतांना पुढील निकष आवश्यक असतांना १) सदर स्टोन क्रशर निरा- सातारा राज्य महामार्गापासून सुमारे २२० मीटर अंतरावर असून बोर्डाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० च्या परिपत्रकानुसार अंतराचे निकष पूर्ण करु शकत नाही. २) कन्व्हेअर बेल्ट शीटने झाकलेले नाही त्यावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. ३) क्रशरच्या परिघाभोवती वारा तोडणारी भिंत करण्यात आलेली नाही. ४) वाहनांच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणेसाठी कोणतीही सुविधा करण्यात आलेली नाही. ५) सदर क्रशरच्या ठिकाणी पुरेसे वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. ६) सदरच्या स्टोन क्रशरकडून (मालकाकडून) जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, १९७४, वायू प्रतिबंध नियंत्रण अधिनियम, १९८१ च्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले असणे, अशा प्रकारे अवैध स्टोन क्रशर चालवून क्रशरच्या मालकाने शासनाचे नुकसान केलेले असणे, यासंदर्भात चौकशी करुन संबंधित स्टोन क्रशर मालकाविरुध्द कारवाई करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**(शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ व गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना) — [अनुक्रमांक (५)] —**

(५) **श्री.प्रसाद लाड, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली व्यवस्था होण्यासाठी शासनाने शासकीय वसतीगृह उभारले असून मुंबईतील चेंबूर नाका परिसरात १ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेणे, परंतु वसतीगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, खाजगी विकासकाने सदर वसतीगृहाचे काम अर्धवट

अग्रिम प्रत

सोडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याने शिक्षणासाठी राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, शासकीय वसतीगृहाचे काम गेल्या १६ वर्षांपासून रखडले असल्यामुळे राज्य शासनाने लक्ष घालून सदर प्रकरणी तात्काळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी चेंबूर येथे शेकडो विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आंदोलन सुरू करणे, त्यामुळे शासनाने याची सखोल चौकशी करून तातडीने शासकीय वसतीगृह उभारण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

**(६)** **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, अनिकेत तटकरे, प्रसाद लाड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्यशासनाकडून संयुक्तपणे दरवर्षी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत असणे, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करुनही राज्यातील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवले असल्याचे निदर्शनास येणे, सदर १ लाख २३ हजार अर्ज महाविद्यालयांकडेच प्रलंबित असल्याने त्यावर समाजकल्याण विभागाला कार्यवाही करता आलेली नसणे, तसेच त्याखेरीज २० हजार अर्ज हे विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आलेले असणे, शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास, संबंधित महाविद्यालयावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन यासंदर्भात कठोर कारवाई करण्याचे शासनाकडून सांगण्यात येणे, परंतु त्याबाबत काही हालचाल झाली नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, परिणामी त्यासंदर्भात शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

**(७)** **श्री.आमश्या पाडवी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात ग्रामीण भागात असलेल्या आरोग्य संस्थांची पुनर्बांधणी होणे आवश्यक असणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांचे दर्जा वाढ होणे तसेच नवीन केंद्रास मंजुरी मिळण्या करिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी बृहत आराखडा तयार करणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी याप्रकरणी नियमान्वये सविस्तर प्रस्ताव आरोग्य विभागास सादर केलेला असणे, सदर आराखड्यास

गेल्या अनेक वर्षांपासून मंजुरी प्रलंबित असल्याने जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होत असणे, नंदुरबार हा एक आदिवासी व अतिदुर्गम जिल्हा असल्याने शासकीय आरोग्य सेवेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय असणे, त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य सेवेस बळकटी देण्याच्या हेतूने जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी सादर केलेल्या बृहत आराखड्यास तात्काळ मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(८) **ॲड.निरंजन डावखरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारीत पूर्व प्राथमिक ते इयत्ता २ री साठी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्रकाशित झाला असणे, त्या पार्श्वभूमीवर एनसीआरटी पाठ्यपुस्तके तयार करीत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात इयत्ता १ ली व २ री साठी नवीन पाठ्यपुस्तके येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यासाठी शासनाने कार्यवाही करणे, सदर अभ्यासक्रम आराखडा आहे तसाच लागू करणार किंवा कसे, एनसीआरटी आणि बालभारती मिळून शैक्षणिकदृष्ट्या दर्जेदार पुस्तकासाठी एक अभ्यास समिती असावी असा निर्णय झाला असणे, असे असताना सुद्धा एनसीआरटी व बालभारती पेक्षा एक वेगळी समिती शासनाने नेमण्याची योजना असल्याचे निदर्शनास येणे, यामुळे शासनाची नेमकी भूमिका व केंद्र सरकारप्रमाणे शिक्षक हस्तपुस्तिका तयार केली त्याच धरतीवर शिक्षक हस्तपुस्तिका तयार करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

(९) **श्री.अभिजित वंजारी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशामध्ये मागील ५ ते ६ वर्षात बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, तसेच महाराष्ट्र राज्यातसुध्दा हे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, यामुळे राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसें-दिवस मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, नोकरी नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, यामुळे अनेक तरुण गुन्हेगारीकडे वळले जात असल्याचे आढळून येणे, यामुळे तरुण पीढी उध्वस्त होत असल्याचे आढळून येणे, यामुळे पालकांमध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण निर्माण होणे, राज्यातील पदवीधर बेरोजगारांना इतर कोणतीही नोकरी मिळत नाही तोपर्यंत या पदवीधर बेरोजगारांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह

अप्रकाशित प्रत

करण्यासाठी दरमहा ५ हजार रुपये मानधन म्हणून देण्यात यावे अशी लोकप्रतिनिधी यांनी वारंवार संबंधितांकडे मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

## - मध्यंतर —

**सहा : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी."

**सात : सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस).**

**आठ : शासकीय विधेयके —**

**(क) उद्योग मंत्री यांचा प्रस्ताव (म.वि.प. नियम १४९ अन्वये) —**

"महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले "**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ - महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३**" मागे घेण्यास अनुमती द्यावी."

---

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ — महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२"

---

**(२)** "सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ — महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

अग्रिम प्रत

"सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

**(१)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(२)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ – मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानपरिषदेच्या १० सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त **सहा महिन्यांच्या आत** सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

अप्रकाशित प्रत

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---

**(३)** "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ —डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३"

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३ — डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

नऊ : (क) **(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३, गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ व शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) —**

**सर्वश्री प्रविण दरेकर,** सुरेश धस, प्रा.राम शिंदे, सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, प्रसाद लाड, रणजितसिंह मोहिते-पाटील, निलय नाईक, रामदास आंबटकर, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, श्रीकांत भारतीय, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विजय उर्फ भाई गिरकर, महादेव जानकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामराव पाटील, प्रविण पोटे-पाटील, वसंत खंडेलवाल, अमरीशभाई पटेल, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव —**

"मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु.१२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या

अग्रिम प्रत

कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खान्देशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खान्देशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खान्देशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार

अमुद्रित प्रत

समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेवून प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(ख) (गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३, बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ व शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव)** –

**सर्वश्री अंबादास दानवे**, एकनाथराव खडसे, सतेज उर्फ बंटी पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, जयंत पाटील, विलास पोतनीस, विक्रम काळे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, अमोल मिटकरी, राजेश राठोड, नरेंद्र दराडे, सतीश चव्हाण, वजाहत मिर्झा, अनिकेत तटकरे, जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, धिरज लिंगाडे, कपिल पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव** –

"राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा-२ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषी मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषी उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे,

"ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क" या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिध्द केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती गठीत करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपुर्वक विलंब करीत असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्यसरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरु करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी

होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असने, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**दहा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

(१) **सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे,** रामदास आंबटकर, प्रवीण दटके, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात वनविभागांतर्गत अनेक भागात बफर झोनची निर्मिती करण्यात येऊन अनेक ठिकाणी अभयारण्य तथा व्याघ्र प्रकल्पाची निर्मिती केली असणे, या बफर झोन अंतर्गत अनेक रहिवाशी तथा पीक क्षेत्र असल्यामुळे या भागातील नागरिक शेती व्यवसाय करीत असणे, या भागालगत तथा वन क्षेत्रालगत वन्य प्राण्यांचा वावर होत असून शेत पिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींनाही सामोरे जावे लागणे तरीही वन विभागामार्फत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नसल्याबाबत अनेक तक्रारी आलेल्या असणे, वन विभागांतर्गत याबाबत योग्य निधीची तरतुद उपलब्ध नसल्याने नुकसान भरपाई व कायमस्वरूपी योजना राबविणेबाबत धोरण असणे, त्यामुळे या भागातील वन्य प्राण्यांपासून शेत पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी या भागातील व गावातील शिवपांधनीला जाळीचे कुंपन लावणे तथा कायमस्वरूपी योजना करण्याकरीता धोरण आखणेबाबत शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री राजहंस सिंह,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.

"मुंबई शहराच्या १ कोटी ३० लाख लोकसंख्येकरीता ३ हजार ८५० एमएलडी पाणी पूर्तता केली जात असणे, सन २०४१ पर्यंत मुंबई शहराची लोकसंख्या १ कोटी ७० लाखांपर्यंत जाण्याची शक्यता असणे, त्यावेळी मुंबई

अप्रकाशित प्रत

शहराला प्रतिदिन ६५३५ एमएलडी पाण्याची आवश्यकता राहील याचा अंदाज करुन, त्यानुसार मुंबई शहराची पाणी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, मुंबई शहराकरिता पाणीपुरवठा करणारे तानसा, मोडक सागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा व भातसा डॅम हे १५० कि.मी. दूर अंतरावर असल्यामुळे २० ते २५ टक्के पाणी गळती व पाणी चोरी होत असणे, त्यामुळे मुंबई शहराला अपुरा पाणीपुरवठा होणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि पाणी माफीयांचे संगनमत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असणे, सदर प्रकारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने भविष्यात उद्‌भवणाऱ्या अपुरा पाणीपुरवठ्याच्या समस्यांचे कायमस्वरुपी निवारण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : १० मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

अस्थायी प्रत